# निशाणी क्र. १४३ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. ७ प्रकाश वासुदेव परब हे दि. ०६/०८/२०२० रोजी मुंबई येथे कोविड काळात मयत झाले आहेत. सदर प्रतिवादीस खालीलप्रमाणे वारस आहेत.

प्रतिवादी क्र. ७ – प्रकाश वासुदेव परब – मयत वारस

१) रेखा प्रकाश परब,
वय – ५० वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. – नंदादीप को.ऑप.हौ.सोसा,पी.पी.डायस कंपाऊंड,
नटवनगर, जोगेश्वरी पूर्व.

सबब वर नमूद केलेप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. ७ चे वारस दाव्यात सामील करुन मिळणेस व त्याप्रमाणे दाव्याचे कामी तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा. सदर अर्ज मंजूर करणेचा झालेस वादी यास रक्कम रु.२०००/– भरणेचा आदेश करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ७ हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप, पृथक कब्जा व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरूस्ती महत्वाची आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत प्रतिवादी क्र. ७ चे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीने दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: २७/१०/२०२१